# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/०४/२०१९
## दि.११/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३१७/१९,भादविक ३२६ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३३,रा.रायकरमळा,धायरी,पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय-३० वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०४/२०१९ रोजी २१/०० वा.फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद वेळी कामावरून सुटुन त्यांचे राहते घरी आले असताना,त्यावेळी त्यांची पत्नी नमुद महिला ही फोनवर बोलत होती. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचे पत्नीस तु फोनवर कोणाशी बोलत आहे. तुझा फोन बघु दे मला असे म्हणाल्याचे कारणावरून तीस त्या गोष्टीचा राग येवुन,तीने स्वयंपाक घरात ठेवलेल्या भाजी कापण्याचे सुरीने फिर्यादी यांचे गळयाचे डावे बाजुवर,गळयाला समोरील मध्यभागी व डावे हाताचे मनगटावर व उजव्या बरगडीवर मारून त्यांना गंभीर जखमी केले आहे. (फिर्यादी यांनी नातेवाईकां बरोबर चर्चा करून आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एच.एम.ननावरे ९५९४९६९३९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १४९/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०२/२०१९ रोजी इंडिया फायनान्स लिमी. ४२०,शुक्रवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने यातील फिर्यादी यांचे ऑफिस मध्ये येऊन,त्याचेजवळील चैन ही सोन्याची आहे असे सांगुन,त्याचेवर सदर इसमाने १,०६,०००/- रुपयेचे कर्ज घेऊन गेला. त्यानंतर फिर्यादी यांना समजले की,सदरची चैन ही खोटी आहे. सदर बाबत फिर्यादी यांनी त्यांचेकडे वेळोवेळी त्याची वस्तु सोडवुन किंवा त्याबदल्यात दुसरी वस्तु आणुन ठेवण्यास सांगितले असता त्याने टाळाटाळ केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय जाधव ९८५०९७५९२० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १४४/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-५५,रा.कसबा पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात महिला मोबाईलधारक व बँकेचे खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे फेब्रुवारी २०१८ ते दि.३१/१२/१८ रोजीचे कालावधीत कसबा पेठ,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक महिला हिने सन मे २०१८ मध्ये जीवनसाथी डॉट कॉम या ऑनलाईन मॅरेज ब्युरोचे माध्यमातुन फिर्यादी यांचेशी संपर्क करून,वेळोवेळी त्यांचा विश्वास संपादन करून,भावनिक करून,फिर्यादी यांना लग्नाचे आमीष दाखवुन,तीचे इंग्लड वरून पाठविलेले पार्सल सोडवुन घेण्यासाठी,फिर्यादीस वेळोवेळी वसई शाखेचे बँकेचे खात्यावर पैसे भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची ४,८५,०००/- रूची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. व्हि.ए.तावडे ९७०२००७५५० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३३०/१९,भादविक ३०९ |
| **फिर्यादी** | हेमचंद्र खोपडे, सहा.पो.निरी. हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | एक महिला,वय-३३ वर्षे,रा.हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०४/२०१९ रोजी सकाळी ०९/४० वा. हडपसर पोलीस स्टेशनचे समोर |
| **तपशिल** | यातील नमुद महिला हिचे पती विरुध्द एका महिलेने भारती विद्यापीठ पो स्टे येथे गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्हया प्रमाणेच,भारती विद्यापीठ पो स्टे येथे फिर्यादी याने दाखल केलेल्या सदर गुन्हयातील फिर्यादी यांचा भाऊ राहुल भगवान वेताळ याचेविरुध्द भादंविक ३७६ प्रमाणेच गुन्हा दाखल करावा असा हडपसर पोलीस स्टेशनवर दबाव आणण्याकरीता, सदर महिलेने स्वतः सोबत आणलेल्या बॅग मधील डिझेलने भरलेली बाटली बाहेर काढुन, त्यामधील डिझेल स्वतःचे अंगावर ओतुन घेवुन,हातातील काडीपेटीने स्वतःला पेटवुन घेण्याचा प्रयत्न करुन,आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.जे.बांदे ७७१९८७६७७७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३९४/१९,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | कुंदन जायले,वय-२९ वर्षे,रा.ठाकुर्ली (ईस्ट) मुंबई |
| **आरोपी** | हिंजवडी,पुणे येथील टेक्नॉलॉजी सोल्युशन्स कंपनीतील दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मागील सहा महिण्यापासून ते दि.१०/०४/२०१९ रोजी २०/३० वा.चे दरम्यान कॉग्निझंन्ट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स हिंजवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा चेतन वसंतराव जायले,वय-२६ वर्षे,रा.सी.५,बालाजी हौसिंग सोसायटी, बालेवाडी फाटा,पुणे हा काम करीत असलेल्या हिंजवडी पुणे येथील टेक्नॉलॉजी सोल्युशन्स कंपनीत यातील नमुद इसमांनी चेतन यास वेळोवेळी मानसिक त्रास दिल्याने त्या त्रासास कंटाळुन,चेतन याने सी.५,बालाजी हौसिंग सोसायटी,बालेवाडी फाटा,पुणे याठिकाणी गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, डी.एस.शिंदे ७२७६१००१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**